जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 AUG 2021

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा मंगळवारी सुरळीत पार पडल्या. यात २८,९४० विद्यार्थ्यांपैकी २७,१३३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

बीकॉम व बीएस्सी आयटी, बीएस्सी, बायो टेक, शुगर टेक्नॉ., ॲनिमेशन, फॉरेन्सिक सायन्स, फूड प्रोसेसिंग, बीसीएस व बीएस्सी कॉम्प्युटर सायन्स, इंटेरिअर डिझायनिंग, ड्रेस मार्केटिंग, फॅशन, बी.ए. मल्टिमीडिया, एमए एमएस्सी, एमकॉम, भाषा अभ्यासक्रमाच्या परीक्षा पार पडल्या. ऑनलाईन परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचण उद्‌भवू नये, यासाठी परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारीवर्ग तसेच सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत होते.

दरम्यान, विद्यापीठ अनुदान आयोग आयोजित 'स्वयंम' परीक्षा दि. २८ व २९ ऑगस्ट रोजी होत आहे. संबंधित विद्यार्थ्यांची योग्य ती माहिती महाविद्यालयाने संबंधित ऑन परीक्षा विभागाकडे दि. ३१ ऑगस्टपर्यंत कळवावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.